**राज्याचे विधानमंडळ (State Legislature)**

**विधानसभेची रचना (Composition of Vidhan Sabha)**

**b) विधानसभेचे अधिकार आणि कार्ये (Powers and functions of Vidhan Sabha)**

**c) विधान परिषदेची रचना (Composition of Vidhan Parishad)**


**d) विधान परिषदेचे अधिकार आणि कार्ये (Powers and functions of Vidhan Parishad)**

**e) राज्यामध्ये कायदा बनवण्याची प्रक्रिया (Law Making Process in State)**

## प्रकरण पहिले
## राज्य विधिमंडळ

**प्रस्तावना :**

भारतीय संघराज्य पद्धतीमध्ये केंद्र आणि राज्य अशा दोन स्तरांवर शासनव्यवस्था चालते आणि या व्यवस्थेअंतर्गत राज्य विधिमंडळ हे राज्याच्या स्तरावर कायदे बनवणारी सर्वोच्च आणि अत्यंत महत्त्वपूर्ण संस्था आहे. भारतीय संविधानाच्या भाग सहा (कलम १६८ ते २१२) मध्ये या विधिमंडळाची रचना, कार्यकाळ आणि अधिकार निश्चित केले आहेत. प्रत्येक राज्याच्या विधिमंडळात राज्यपाल आणि एक किंवा दोन सभागृहे समाविष्ट असतात. बहुतेक राज्यांमध्ये एकच सभागृह असते, ज्याला विधानसभा म्हणतात, तर महाराष्ट्र आणि उत्तर प्रदेशसारख्या काही राज्यांमध्ये विधान परिषद हे दुसरे सभागृह अस्तित्वात आहे. विधिमंडळाचे मुख्य कार्य राज्यासाठी आवश्यक असलेले कायदे तयार करणे, विशेषतः राज्य सूची आणि समवर्ती सूची मधील विषयांवर, तसेच अस्तित्वात असलेल्या कायद्यांमध्ये सुधारणा करणे हे आहे. या दोन सभागृहांपैकी, लोकांचे थेट प्रतिनिधित्व करणारी विधानसभा हे अधिक शक्तिशाली सभागृह आहे. राज्याचे मंत्रीमंडळ विधानसभेला सामुहिकरित्या जबाबदार असते, ज्यामुळे विधिमंडळ प्रशासकीय आणि आर्थिक कार्यावर प्रभावी नियंत्रण ठेवते. थोडक्यात, राज्य विधिमंडळ हे केवळ कायदेशीर चौकट पुरवणारे केंद्र नसून, ते राज्याच्या प्रशासकीय, आर्थिक, राजकीय कार्यावर देखरेख ठेवणारे आणि नागरिकांच्या आकांक्षा व समस्यांना वाचा फोडणारे एक महत्त्वाचे लोकशाही व्यासपीठ आहे.



## I. विधानसभा - रचना

विधानसभा हे भारतीय लोकशाहीतील एक महत्त्वाचे अंग आहे. हे घटक राज्यातील लोकांमार्फत निवडून आलेल्या प्रतिनिधींचे सभागृह आहे. राज्याच्या कारभारात आणि कायदा निर्मितीमध्ये विधानसभेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. भारतीय संविधानाने प्रत्येक राज्यासाठी विधानसभेची तरतूद केली आहे, ज्यामुळे राज्यांना स्वतःच्या गरजा आणि प्राधान्यांनुसार कायदे करण्याची आणि धोरणे आखण्याची स्वायत्तता मिळते. विधानसभा हे लोकांच्या आकांक्षा आणि गरजांचे प्रतिबिंब असते. या सभागृहात विविध पक्षांचे आणि समाजाच्या विविध स्तरांतील प्रतिनिधी एकत्र येतात आणि राज्याच्या विकासासाठी तसेच नागरिकांच्या हितासाठी चर्चा, वादविवाद आणि निर्णय घेतात. त्यामुळे, विधानसभा केवळ एक कायदेशीर संस्था नसून, ती लोकशाही मूल्यांची आणि लोकांच्या सार्वभौमत्वाची एक जिवंत प्रतीक आहे.

विधानसभा हे भारतीय राज्याच्या विधिमंडळातील जनतेचे प्रतिनिधित्व करणारे आणि सर्वात शक्तीशाली सभागृह आहे. भारतीय लोकशाहीतील राज्याच्या स्तरावरील हे कनिष्ठ सभागृह आहे, जे थेट लोकांच्या मतावर आधारित असल्यामुळे केंद्र सरकारमधील लोकसभेप्रमाणेच अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते.

### १.विधानसभेतील सदस्यसंख्या आणि प्रमाण :

भारतीय संविधानाने विधानसभेच्या रचनेत प्रतिनिधित्व आणि कार्यक्षमतेचा योग्य समन्वय साधण्यासाठी सदस्यसंख्येची चौकट निश्चित केली आहे. कलम १७० अंतर्गत या तरतुदी दिल्या आहेत, ज्या लोकशाहीचे संतुलन साधतात. संविधानाने विधानसभेच्या सदस्यसंख्येसाठी कमाल मर्यादा ५०० आणि किमान मर्यादा ६० निश्चित करून लोकशाही प्रतिनिधित्वाची चौकट निश्चित केली आहे.

- **कमाल मर्यादा (५००):** ही मर्यादा मोठ्या राज्यांमध्ये सदस्यांची संख्या खूप जास्त होऊन प्रशासकीय आणि चर्चेची प्रक्रिया किचकट होऊ नये यासाठी निश्चित केली आहे.
- **किमान मर्यादा (६०):** ही मर्यादा सुनिश्चित करते की लहान राज्यांमध्येही विविध क्षेत्रांना पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे.
- **अपवाद:** गोवा (४०), सिक्कीम (३२), मिझोराम (४०) यांसारख्या लहान राज्यांसाठी संविधानाने विशेष तरतुदी केल्या आहेत. यामुळे त्यांच्या विशिष्ट भौगोलिक आणि लोकसंख्यात्मक गरजा पूर्ण होतात.

### २.निवडणुकीची पद्धत :

विधानसभेचे सदस्य हे संबंधित राज्यातील प्रादेशिक मतदारसंघांमधून थेट निवडणुकीद्वारे प्रौढ मतदानाच्या आधारावर लोकांकडून निवडून येतात. यामुळे विधानसभा ही राज्याच्या जनतेची इच्छा प्रतिबिंबित करते. प्रत्येक राज्याला प्रादेशिक मतदारसंघांमध्ये विभागले जाते, जेणेकरून प्रत्येक मतदारसंघातील लोकसंख्येचे प्रमाण शक्य तितके समान राहील. मतदारसंघांची रचना लोकसंख्येच्या आधारावर केली जाते. हे तत्त्व 'एका व्यक्तीचे एक मत आणि एका मताचे एक मूल्य' हे सुनिश्चित करते.

**३.आरक्षण:**

अनुच्छेद ३३२ नुसार, प्रत्येक राज्याच्या विधानसभेत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती यांच्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित ठेवल्या जातात. या आरक्षणाची तरतूद अनुच्छेद ३३४ नुसार वेळोवेळी वाढवली जाते. यानुसार महाराष्ट्रात २८८ जागांपैकी काही जागा अनुसूचित जाती (SC) आणि अनुसूचित जमाती (ST) च्या उमेदवारांसाठी आरक्षित आहेत. सध्या, २९ मतदारसंघ अनुसूचित जातींसाठी आणि २५ मतदारसंघ अनुसूचित जमातींसाठी राखीव आहेत.

**४.नामनिर्देशन :**

विधानसभेच्या रचनेत नामनिर्देशनाची तरतूद अल्पसंख्याक समुदायाला प्रतिनिधीत्व देण्यासाठी करण्यात आली होती. अँग्लो-इंडियन समाजाला (लोकसंख्येनुसार पुरेसे प्रतिनिधित्व मिळू शकत नसल्यास, राज्यपालांना एका सदस्याला नामनिर्देशित करण्याचा अधिकार होता. १०४ व्या घटनादुरुस्ती कायदा, २०१९ नुसार, अँग्लो-इंडियन सदस्यांच्या नामनिर्देशनाची तरतूद रद्द करण्यात आली आहे. हा बदल संसदेत आणि राज्यांच्या विधिमंडळात दोन्ही ठिकाणी लागू झाला आहे.

**५.कार्यकाळ:**

अनुच्छेद १७२ नुसार विधानसभेचा सामान्य कार्यकाळ पाच वर्षांचा असतो.या मुदतीपूर्वीही राज्यपाल विधानसभा विसर्जित करू शकतात आणीबाणीच्या परिस्थितीत (राष्ट्रीय आणीबाणी) संसदेला कायद्याद्वारे विधानसभेचा कार्यकाळ एकावेळी एका वर्षाने वाढवण्याचा अधिकार आहे. मात्र, आणीबाणी संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत विधानसभा निवडणूक घेणे आवश्यक आहे.

**६.सदस्य होण्याची पात्रता:**

**अ. विधानसभेचा सदस्य होण्यासाठी पात्रता**

भारतीय संविधानाच्या **अनुच्छेद १७३** नुसार, विधानसभेचा सदस्य (आमदार - MLA) होण्यासाठी खालील पात्रता असणे आवश्यक आहे:

- ती व्यक्ती भारताचा नागरिक असावी.
- तिचे वय २५ वर्षांपेक्षा कमी नसावे.
- तिने निवडणूक आयोगाने अधिकृत केलेल्या व्यक्तीसमोर तिसऱ्या परिशिष्टात दिलेल्या नमुन्यानुसार शपथ घेतली पाहिजे किंवा प्रतिज्ञा केली पाहिजे आणि त्यावर सही केली पाहिजे. यामध्ये तिला भारताच्या संविधानावर निष्ठा ठेवण्याची आणि भारताची सार्वभौमता व अखंडता टिकवून ठेवण्याची शपथ घ्यावी लागते.
- आवश्यक असलेले इतर कोणतेही निकष वेळोवेळी निश्चित केले आहेत. उदाहरणार्थ, 'लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१' मध्ये काही अतिरिक्त अटी नमूद केल्या आहेत.
- उमेदवार ज्या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहे, त्या मतदारसंघातील मतदार असावा. (काही अपवाद वगळता)

**ब. विधानसभेच्या सदस्यत्वाची अपात्रता :**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद १९१ नुसार, खालीलपैकी कोणतीही अट पूर्ण केल्यास एखादी व्यक्ती विधानसभेचा सदस्य म्हणून निवडण्यास अपात्र ठरते किंवा निवडून आल्यानंतर तिचे सदस्यत्व रद्द होऊ शकते:

- जर ती व्यक्ती भारत सरकार किंवा कोणत्याही राज्य सरकारच्या अधीन लाभाचे पद धारण करत असेल (संसद किंवा राज्य विधानमंडळाने कायद्याद्वारे असे पद लाभाचे मानले नाही, तर अपवाद).
- जर ती व्यक्ती सक्षम न्यायालयाने 'विकृत चित्त' असलेली घोषित केली असेल
- जर ती व्यक्ती दिवाळखोर घोषित झाली असेल आणि तिला अजूनही कर्जमुक्त केले नसेल.
- जर ती व्यक्ती भारताची नागरिक नसेल, किंवा स्वेच्छेने परदेशी राज्याचे नागरिकत्व घेतले असेल, किंवा परदेशी राज्याप्रति निष्ठा किंवा संलग्नता स्वीकारली असेल.
- जर संसदेने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे ती व्यक्ती अपात्र ठरली असेल. 'लोकप्रतिनिधित्व कायदा, १९५१' मध्ये अशा अनेक अपात्रता नमूद केल्या आहेत, जसे की:
  - निवडणूक गुन्हे किंवा भ्रष्ट आचरण केल्याबद्दल दोषी ठरले असल्यास.
  - दोन किंवा अधिक वर्षांची शिक्षा झालेल्या गुन्हेगारी प्रकरणात दोषी ठरले असल्यास.
  - वेळेत निवडणूक खर्चाचा हिशेब सादर न केल्यास.
  - सरकारी करार किंवा कामांमध्ये स्वारस्य असल्यास.
  - सामाजिक गुन्हे (उदा. अस्पृश्यता, हुंडा, सती) प्रोत्साहन दिल्याबद्दल दोषी ठरले असल्यास.

**क.पक्षांतर विरोधी कायदा :** संविधानाच्या **दहाव्या परिशिष्टात (Tenth Schedule)** नमूद केलेल्या पक्षांतर विरोधी कायद्यानुसार देखील सदस्यत्व रद्द होऊ शकते. जर एखादा सदस्य:

- स्वेच्छेने आपल्या राजकीय पक्षाचे सदस्यत्व सोडतो.
- पक्षाने दिलेल्या निर्देशांविरुद्ध मतदान करतो किंवा मतदानातून गैरहजर राहतो.
- अपक्ष निवडून आल्यानंतर कोणत्याही राजकीय पक्षात सामील होतो.
- नामनिर्देशित सदस्य (विधान परिषदेसाठी लागू) सहा महिन्यांच्या आत कोणत्याही राजकीय पक्षात सामील होतो.

सदस्याच्या अपात्रतेबद्दलचा प्रश्न उद्भवल्यास (पक्षांतर वगळता), राज्यपालांचा निर्णय अंतिम असतो. परंतु, राज्यपाल निवडणूक आयोगाचा सल्ला घेऊनच निर्णय घेतात. पक्षांतर विरोधी कायद्यांतर्गत अपात्रतेचा निर्णय विधानसभेचे अध्यक्ष घेतात.

**७.विधानसभा सदस्यांचे वेतन आणि भत्ते**

विधानसभा सदस्यांचे (आमदार - MLA) वेतन आणि भत्ते राज्याच्या विधिमंडळाने वेळोवेळी कायद्यानुसार निश्चित केले जातात. संविधानातील **कलम १९५** नुसार ही तरतूद आहे. महाराष्ट्रातील

आमदारांना मिळणारे वेतन आणि भत्ते महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन, भत्ते आणि अन्य सोयी-सुविधा अधिनियम, १९५६ या कायद्यानुसार निश्चित केले जातात.

**८.विधानसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष:**

भारतीय राज्यघटनेचे **अनुच्छेद १७८** हे राज्य विधानसभेच्या कामकाजासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. हे कलम विधानसभेला आपले कामकाज व्यवस्थित चालवण्यासाठी आपल्याच सदस्यांमधून एका **अध्यक्षाची** आणि एका **उपाध्यक्षाची** निवड करण्याचे अधिकार देते. ही दोन्ही पदे विधानसभेच्या कामकाजात सुसूत्रता, नियमन आणि शिस्त राखण्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत.

**अ)निवड प्रक्रिया :**

अनुच्छेद १७८ नुसार, विधानसभा शक्य तितक्या लवकर अध्यक्षाची आणि उपाध्यक्षाची निवड करतात.

- **सदस्यांमधून निवड:** अध्यक्ष आणि उपाध्यक्ष हे विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांमधूनच निवडले जातात. बाहेरील व्यक्ती या पदांवर येऊ शकत नाही.
- **तात्काळ निवड:** नवीन विधानसभा गठीत झाल्यानंतर किंवा अध्यक्ष/उपाध्यक्ष पदाची जागा रिक्त झाल्यानंतर, शक्य तितक्या लवकर ही निवड प्रक्रिया पूर्ण करणे अपेक्षित असते. यात अनावश्यक विलंब टाळला जातो.
- **अंतर्गत प्रक्रिया:** ही निवड विधानसभेची अंतर्गत बाब आहे. सदस्य स्वतः आपल्या सभागृहाचे पीठासीन अधिकारी निवडतात. नवीन सदस्यांना शपथ देण्यासाठी आणि अध्यक्षाच्या निवडीचे कामकाज चालवण्यासाठी तात्पुरत्या अध्यक्षाची नियुक्ती राज्यपालांकडून केली जाते.

**ब) अध्यक्षांची भूमिका आणि कार्ये :**

अध्यक्ष हे विधानसभेचे प्रमुख पीठासीन अधिकारी असतात आणि त्यांची भूमिका अत्यंत व्यापक व जबाबदारीची असते. त्यांच्या प्रमुख जबाबदाऱ्यांमध्ये सभागृहाचे कामकाज नियमांनुसार चालवतात हे समाविष्ट आहे. याव्यतिरिक्त त्यांची कार्ये खालीलप्रमाणे आहेत:

- **सभागृहाचे अध्यक्षपद भूषवणे:** अध्यक्षांच्या अध्यक्षतेखालीच विधानसभेचे कामकाज चालते. ते सभागृहात शिस्त आणि सुव्यवस्था राखतात.
- **चर्चा व वादविवादांचे नियमन:** ते सदस्यांना बोलण्याची संधी देतात, वेळेचे बंधन घालतात आणि चर्चेची दिशा ठरवतात. सदस्यांनी नियमांनुसारच बोलावे याची खात्री करतात.
- **शिस्त आणि सुव्यवस्था राखणे:** सभागृहात गोंधळ, अव्यवस्था निर्माण झाल्यास अध्यक्षांना ते नियंत्रित करण्याचे अधिकार आहेत. ते असंसदीय शब्द काढून टाकू शकतात, सदस्यांना निलंबित करू शकतात किंवा सभागृहाचे कामकाज स्थगित करू शकतात.
- **नियमांचा अर्थ लावणे:** विधानसभेच्या कामकाजाच्या नियमांचा आणि कार्यपद्धतीचा अंतिम अर्थ लावणारे अध्यक्षच असतात. त्यांच्या निर्णयावर सहसा प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात नाही.

- **प्रस्ताव आणि प्रश्नांना मान्यता:** सदस्यांनी मांडलेले ठराव, प्रश्न, प्रस्ताव इत्यादींना ते नियमांनुसार मान्यता देतात.
- **मतदान आणि निर्णायक मत :** सामान्यतः अध्यक्ष मतदानात भाग घेत नाहीत. परंतु, एखाद्या विषयावर समान मते पडल्यास (मतदान बरोबरीत सुटल्यास), ते आपले **निर्णायक मत** देऊन कोंडी फोडतात. यामुळे निर्णय घेणे शक्य होते.
- **अधिकारांचे रक्षण:** ते सभागृहातील सदस्यांचे आणि संपूर्ण विधानसभेचे विशेषाधिकार व हक्कांचे रक्षक असतात.
- **प्रशासकीय कार्ये:** विधानसभा सचिवालयावर त्यांचे प्रशासकीय नियंत्रण असते.
- **धन विधेयक प्रमाणित करणे:** ज्या राज्यांमध्ये विधानपरिषद आहे, तिथे एखादे विधेयक 'धन विधेयक' (Money Bill) आहे की नाही, हे अध्यक्षच प्रमाणित करतात. त्यांच्या प्रमाणपत्राशिवाय ते धन विधेयक मानले जात नाही.

**क). उपाध्यक्षांची भूमिका आणि कार्ये :**

उपाध्यक्षांची भूमिका अध्यक्षांना मदत करण्याची आणि त्यांच्या अनुपस्थितीत त्यांची जबाबदारी पार पाडण्याची असते.

- **अध्यक्षांच्या अनुपस्थितीत कामकाज चालवणे:** जेव्हा अध्यक्षांचे पद रिक्त असते (उदा. राजीनामा, मृत्यू, पदावरून काढणे) किंवा अध्यक्ष सभेच्या कामकाजात अनुपस्थित असतात, तेव्हा उपाध्यक्ष अध्यक्षांची कर्तव्ये पार पाडतात.
- **अध्यक्षांचे सर्व अधिकार:** जेव्हा उपाध्यक्ष अध्यक्षांच्या जागी कामकाज पाहतात, तेव्हा त्यांना अध्यक्षांप्रमाणेच सर्व अधिकार आणि कार्ये प्राप्त होतात.
- **अध्यक्षांच्या अधीन:** प्रशासकीय बाबतीत उपाध्यक्ष हे अध्यक्षांच्या अधीन असतात.

**ड.)पद रिक्त होणे, राजीनामा आणि पदावरून काढणे:**

अनुच्छेद १७९ मध्ये अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या पद रिक्त होणे, राजीनामा देणे आणि त्यांना पदावरून काढण्यासंबंधीच्या तरतुदी आहेत.

- **पद रिक्त होणे:** जर अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष विधानसभेचे सदस्य राहिले नाहीत, तर त्यांचे पद आपोआप रिक्त होते.
- **राजीनामा:** अध्यक्ष उपाध्यक्षांना उद्देशून आणि उपाध्यक्ष अध्यक्षांना उद्देशून लेखी राजीनामा देऊन आपले पद सोडू शकतात.
- **पदावरून काढणे:** विधानसभा अध्यक्षांना किंवा उपाध्यक्षांना **तत्कालीन एकूण सदस्यांच्या बहुमताने** मंजूर केलेल्या ठरावाद्वारे पदावरून काढू शकते. असा ठराव मांडण्यापूर्वी किमान चौदा दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक असते.

**५. महत्त्व :**

विधानसभेत अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची पदे लोकशाही कामकाजासाठी अत्यंत महत्त्वाची आहेत. ती खालील बाबी सुनिश्चित करतात:

- **व्यवस्थित कामकाज:** त्यांच्याशिवाय विधानसभेचे कामकाज अराजक होईल.
- **निष्पक्षता:** अध्यक्षांकडून निष्पक्षपणे वागणे आणि नियमांचे पालन करणे अपेक्षित आहे.
- **अधिकारांचे संरक्षण:** ते प्रत्येक सदस्याच्या हक्कांचे आणि सभागृहाच्या सामूहिक विशेषाधिकारांचे रक्षण करतात.
- **लोकशाही चर्चा:** वादविवादांचे नियमन करून, ते कायदेशीर बाबींवर अर्थपूर्ण चर्चा आणि विचारविनिमय सुकर करतात.

थोडक्यात, अनुच्छेद १७८ हे राज्य विधानमंडळांच्या नेतृत्वाची संरचना निश्चित करते, ज्यामुळे अध्यक्ष आणि उपाध्यक्षांना कायदेशीर प्रक्रियांचे मार्गदर्शन करण्यास आणि संसदीय लोकशाहीच्या तत्त्वांचे पालन करण्यास सक्षम केले जाते.

## II. विधानसभेचे अधिकार आणि कार्ये

विधानसभा हे राज्याच्या विधिमंडळाचे कनिष्ठ सभागृह असते. राज्याच्या कारभारात आणि धोरण निर्मितीमध्ये विधानसभेची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. लोकशाही व्यवस्थेमध्ये ते जनतेच्या प्रतिनिधींचे सभागृह असून, राज्याच्या विकासासाठी कायदे करणे, सरकारवर नियंत्रण ठेवणे आणि जनतेच्या समस्या मांडणे ही त्यांची प्रमुख कार्ये आहेत. महाराष्ट्रा विधानसभेचे कार्य पुढीलप्रमाणे आहे.

**अ) कायदेविषयक कार्ये**

विधानसभा हे राज्याच्या स्तरावर कायदे बनवणारे मुख्य कायदेमंडळ आहे. भारतीय संविधानाने विधानसभेला राज्याच्या भौगोलिक आणि सामाजिक सीमेतील विषयांवर कायदे करण्याचे व्यापक अधिकार दिले आहेत. हे अधिकार राज्याच्या गरजा, समस्या आणि विकासात्मक उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आवश्यक आहेत. विधानसभेच्या या कार्यामुळे राज्याच्या कारभारात स्थानिक परिस्थितीनुसार लवचिकता येते, कारण प्रत्येक राज्याची परिस्थिती भिन्न असते. राज्याच्या कायदेविषयक अधिकारांची ही चौकट संविधानाच्या सातव्या परिशिष्टातील तीन सूचींच्या माध्यमातून स्पष्ट केली जाते.

**१.राज्य सूचीतील विषय आणि अनन्य अधिकार**

'राज्य सूची' मध्ये समाविष्ट असलेल्या विषयांवर कायदा करण्याचा **अनन्य अधिकार** विधानसभेला आहे. याचा अर्थ, सामान्य परिस्थितीत, या विषयांवर फक्त राज्य सरकारच कायदे करू शकते.

- **सार्वजनिक सुव्यवस्था आणि पोलीस:** शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच पोलीस यंत्रणेच्या कार्यपद्धतीसाठी नियम बनवले जातात, जे राज्याच्या दैनंदिन कारभारासाठी अत्यावश्यक आहेत.

- **स्थानिक स्वराज्य संस्था:** नगरपालिका, ग्रामपंचायतींसारख्या तळागाळातील संस्थांची रचना, कारभार आणि अधिकार निश्चित करण्याचे अधिकार विधानसभेला असल्याने लोकशाही विकेंद्रित होते.
- **सार्वजनिक आरोग्य आणि शेती:** आरोग्य सेवा, स्वच्छता, रोग नियंत्रण, तसेच शेतीविषयक धोरणे आणि जमीन सुधारणांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर कायदे करणे राज्याच्या जनतेच्या मूलभूत गरजांशी थेट जोडलेले आहे.

या विषयांवरील कायदे त्या-त्या राज्याच्या भौगोलिक, सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीनुसार भिन्न असू शकतात, ज्यामुळे राज्यांना त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार कायदे करण्याची स्वायत्तता मिळते.

**२.समवर्ती सूचीतील विषय आणि दुहेरी अधिकार**

समवर्ती सूचीतील विषय हे असे आहेत ज्यांचे महत्त्व राष्ट्रीय तसेच प्रादेशिक दोन्ही स्तरांवर असते. यामुळे या विषयांवर संसद (केंद्र सरकार) आणि राज्य विधानसभा या दोघांनाही कायदे करण्याचा अधिकार आहे.

- **उदाहरणे:** शिक्षण, वन, कामगार कल्याण, विवाह, घटस्फोट, दिवाणी प्रक्रिया संहिता यांसारख्या विषयांवर कायदे करताना केंद्र आणि राज्यांनी समन्वय साधणे अपेक्षित असते.
- हा दुहेरी अधिकार राज्यांना राष्ट्रीय धोरणांना पूरक कायदे बनवण्याची संधी देतो, तर त्याच वेळी त्यात राज्याच्या प्रादेशिक गरजा समाविष्ट करण्याची मुभा मिळते.

**३. केंद्राच्या कायद्याचे प्राबल्य आणि अपवाद**

समवर्ती सूचीतील विषयावर केंद्र आणि राज्याने दोन्ही ठिकाणी कायदे केले असल्यास, केंद्राचा कायदा प्रभावी ठरतो.

- **मूलभूत नियम:** जर राज्याने केलेला कायदा केंद्राच्या कायद्याशी विसंगत असेल, तर केंद्राचा कायदा लागू होतो आणि राज्याचा कायदा त्या विसंगतीच्या मर्यादेपर्यंत रद्द होतो. हे तत्त्व देशात कायद्याची एकजिनसीपणा आणि सुसंवाद राखण्यासाठी आवश्यक आहे.
- **अपवाद:** राज्याचा कायदा केंद्राच्या कायद्यावर प्रभावी ठरू शकतो, परंतु यासाठी ती तरतूद राष्ट्रपतींच्या विचारासाठी राखून ठेवली गेली असावी आणि त्या तरतुदीला राष्ट्रपतींची संमती मिळाली असावी. या अपवादात्मक तरतुदीमुळे राज्यांना त्यांच्या विशिष्ट कायद्यांना केंद्राच्या कायद्यांवर प्रभावी करण्याची मर्यादित संधी मिळते.

**४. जुन्या कायद्यांमध्ये सुधारणा करणे किंवा ते रद्द करणे**

केवळ नवीन कायदे बनवणेच नाही, तर काळानुसार बदललेल्या परिस्थितीनुसार जुन्या कायद्यांमध्ये आवश्यक सुधारणा करणे किंवा निरुपयोगी ठरलेले कायदे रद्द करणे हे देखील विधानसभेचे महत्त्वाचे कार्य आहे. यामुळे राज्याची कायदेशीर व्यवस्था अद्ययावत राहते आणि ती लोकांच्या सध्याच्या गरजा पूर्ण करते.

**५. विधेयके संमत करण्याची प्रक्रिया :**

कोणताही नवीन कायदा त्वरित बनत नाही, तर तो एका विशिष्ट प्रक्रियेतून जातो. या प्रक्रियेला विधेयक संमत करणे म्हणतात.

- **विधेयकाची मांडणी:** कोणताही नवीन कायदा हा सुरुवातीला **'विधेयकाच्या'** स्वरूपात विधानसभेत मांडला जातो. हे विधेयक साधारणपणे संबंधित मंत्र्याद्वारे (सरकारी विधेयक) किंवा इतर कोणत्याही आमदाराद्वारे (खाजगी सदस्य विधेयक) सादर केले जाते.
- **वाचन प्रक्रिया :** विधेयकावर विधानसभेत अनेक टप्प्यांवर चर्चा होते, ज्यांना 'वाचन' म्हणतात. यात सर्वसाधारण चर्चा, प्रत्येक कलमावर चर्चा, दुरुस्त्या सुचवणे आणि शेवटी विधेयकाला मतदान करणे समाविष्ट असते.
- **दोन सभागृहांची मंजुरी :** विधानसभेने संमत केलेले विधेयक विधान परिषदेकडे मंजुरीसाठी जाते. विधान परिषदेला विधेयकात दुरुस्त्या सुचवण्याचा किंवा त्याला काही काळासाठी थांबवण्याचा अधिकार असतो, परंतु साधारण विधेयकांच्या बाबतीत विधानसभेचा निर्णय अंतिम असतो.
- **राज्यपालांची स्वाक्षरी :** दोन्ही सभागृहांनी (असल्यास) विधेयक संमत केल्यानंतर ते राज्यपालांच्या स्वाक्षरीसाठी पाठवले जाते.
    - राज्यपाल विधेयकाला संमती देऊ शकतात, संमती रोखू शकतात किंवा पुनर्विचारासाठी परत पाठवू शकतात.
    - जर राज्यपालांनी पुनर्विचारासाठी विधेयक परत पाठवले आणि विधानसभेने ते पुन्हा काही बदलांसह किंवा बदलांशिवाय संमत करून पाठवले, तर राज्यपालांना त्यावर स्वाक्षरी करणे बंधनकारक असते (धन विधेयकांच्या बाबतीत राज्यपाल सहसा संमती रोखत नाहीत).
    - काही विशिष्ट विधेयके राष्ट्रपतींच्या विचारार्थ  ठेवण्याचा अधिकारही राज्यपालांना असतो.
- **कायद्यात रूपांतरण:** राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतरच त्या विधेयकाचे कायद्यात रूपांतर होते आणि ते राज्यामध्ये लागू होते.

**ब) विधानसभेचे कार्यकारी मंडळावरील नियंत्रण**

लोकशाही व्यवस्थेमध्ये, केवळ कायदे बनवणेच पुरेसे नाही, तर ते कायदे अंमलात आणणाऱ्या कार्यकारी मंडळावर म्हणजेच मंत्रिमंडळावर आणि मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखालील प्रशासनावर प्रभावी नियंत्रण ठेवणे अत्यंत आवश्यक असते. विधानसभा हे कार्य विविध माध्यमांतून पार पाडते, ज्यामुळे सरकार जनतेला जबाबदार राहते.

**१. सामूहिक जबाबदारी**

हे कार्यकारी मंडळावरील नियंत्रणाचे सर्वात मूलभूत आणि महत्त्वाचे तत्त्व आहे.

- **अर्थ:** याचा अर्थ असा की, मुख्यमंत्री आणि त्यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण मंत्रिमंडळ आपल्या सर्व धोरणांसाठी आणि कृतींसाठी विधानसभेला सामूहिकपणे जबाबदार असते. कोणताही एक मंत्री जरी एखाद्या विशिष्ट खात्याचा प्रमुख असला तरी, त्याच्या निर्णयासाठी संपूर्ण मंत्रिमंडळ जबाबदार असते. जर एखाद्या मंत्र्याच्या धोरणावर विधानसभा नाराज असेल, तर त्याचा परिणाम संपूर्ण मंत्रिमंडळाच्या स्थैर्यावर होतो.

- **विश्वासाचे महत्त्व:** मंत्रिमंडळ विधानसभेच्या विश्वासावर अवलंबून असते. जोपर्यंत विधानसभेतील बहुसंख्य सदस्यांचा मंत्रिमंडळावर विश्वास असतो, तोपर्यंत ते सत्तेवर राहू शकतात. विधानसभेने एकदा मंत्रिमंडळावरील विश्वास गमावला की, त्यांना राजीनामा द्यावा लागतो. यामुळे सरकारला नेहमीच जनतेच्या प्रतिनिधींचा पाठिंबा असल्याची खात्री करावी लागते.

**२. अविश्वास ठराव**

हे कार्यकारी मंडळावरील नियंत्रण ठेवण्याचे सर्वात कठोर आणि थेट साधन आहे.

- **केव्हा मांडला जातो?** जेव्हा विरोधी पक्षांना असे वाटते की मंत्रिमंडळाने विधानसभेचा विश्वास गमावला आहे किंवा सरकार बहुमतात नाही, तेव्हा ते अविश्वास ठराव मांडतात.
- **प्रक्रिया आणि परिणाम:** हा ठराव संमत झाल्यास (बहुमताने मंजूर झाल्यास), मंत्रिमंडळाला तात्काळ राजीनामा द्यावा लागतो. यानंतर नवीन सरकार स्थापन केले जाते किंवा निवडणुका घेतल्या जातात. हा ठराव म्हणजे सरकारला सत्तेवरून दूर करण्याचे कायदेशीर साधन आहे आणि यामुळे सरकारला नेहमीच सतर्क राहावे लागते.

**३. प्रश्न विचारणे :**

हे कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचे एक नियमित आणि प्रभावी माध्यम आहे.

- **उद्देश:** विधानसभेचे सदस्य (आमदार) मंत्र्यांना त्यांच्या खात्याच्या कामकाजाबद्दल, धोरणांबद्दल, निर्णयांबद्दल आणि प्रशासकीय कार्यवाहीबद्दल माहिती विचारू शकतात. यामुळे सरकारला त्यांच्या कामाबद्दल स्पष्टीकरण द्यावे लागते आणि ते जबाबदार राहतात.
- **प्रकार:**
  - **तारांकित प्रश्न :** या प्रश्नांना मंत्र्यांना सभागृहात **तोंडी उत्तर** द्यावे लागते आणि सदस्यांना त्यावर **पूरक प्रश्न** विचारण्याचा अधिकार असतो. यामुळे थेट संवाद साधला जातो आणि मंत्र्यांवर अधिक दबाव येतो.
  - **अतारांकित प्रश्न :** या प्रश्नांची उत्तरे मंत्र्यांना **लिखित स्वरूपात** द्यावी लागतात. यावर पूरक प्रश्न विचारता येत नाहीत, पण त्यामुळे अधिक तपशीलवार माहिती मिळवता येते.
  - **अल्प-सूचना प्रश्न :** तातडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर कमी वेळेत प्रश्न विचारण्यासाठी यांचा वापर केला जातो.

**४. लक्षवेधी सूचना आणि स्थगन प्रस्ताव :**

हे दोन्ही प्रस्ताव सार्वजनिक महत्त्वाच्या तातडीच्या विषयांवर चर्चा घडवून आणण्यासाठी वापरले जातात.

- **लक्षवेधी सूचना :** जेव्हा एखाद्या तातडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विषयाकडे सरकारचे लक्ष वेधायचे असते, तेव्हा एखादा सदस्य ही सूचना मांडतो. यावर मंत्री संक्षिप्त निवेदन देतात आणि सदस्य त्यावर स्पष्टीकरण मागू शकतात. यामुळे सरकारला अचानक उद्भवलेल्या समस्यांवर उत्तर देण्यास भाग पाडले जाते.

- **स्थगन प्रस्ताव :** हा एक गंभीर स्वरूपाचा प्रस्ताव आहे, जो तातडीच्या आणि सार्वजनिक महत्त्वाच्या विशिष्ट घटनेवर चर्चा करण्यासाठी मांडला जातो. हा प्रस्ताव संमत झाल्यास सभागृहाचे नियमित कामकाज थांबवून त्या विशिष्ट विषयावर चर्चा केली जाते. याचा वापर सरकारला विशिष्ट मुद्द्यावर तात्काळ उत्तर देण्यासाठी आणि त्यांच्या निष्क्रियतेबद्दल जबाबदार धरण्यासाठी केला जातो. हा प्रस्ताव सहसा सरकारवर टीकेसाठी वापरला जातो.

**५. निंदा प्रस्ताव :**

हा प्रस्ताव सरकार किंवा एखाद्या मंत्र्याच्या विशिष्ट धोरणावर किंवा कृतीवर तीव्र नाराजी किंवा निषेध व्यक्त करण्यासाठी मांडला जातो. अविश्वास ठरावाप्रमाणे यामुळे सरकारला राजीनामा द्यावा लागत नाही, परंतु हे सरकारवरील नैतिक दबाव वाढवते. या ठरावामुळे सरकारला आपल्या धोरणांचा किंवा मंत्र्यांच्या कामकाजाचा फेरविचार करण्यास भाग पाडले जाते आणि त्यांना आपल्या चुका मान्य करण्यास किंवा स्पष्टीकरण देण्यास प्रवृत्त केले जाते.

थोडक्यात विधानसभेचे कार्यकारी मंडळावरील नियंत्रण केवळ औपचारिक नसून, ते लोकशाही व्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. या विविध माध्यमांतून विधानसभा सरकारला जनतेप्रती जबाबदार ठेवते,

**क)विधानसभेची वित्तीय कार्ये :**

राज्याच्या **वित्तव्यवस्थेवर नियंत्रण** ठेवणे हे विधानसभेचे एक अत्यंत महत्त्वाचे कार्य आहे. हे सुनिश्चित करते की सरकार जनतेच्या पैशाचा वापर जबाबदारीने, पारदर्शकपणे आणि राज्याच्या हितासाठी करत आहे.

**१. अर्थसंकल्प संमत करणे :** राज्याच्या वित्तीय नियंत्रणाचा केंद्रबिंदू म्हणजे **वार्षिक अर्थसंकल्प** होय.

- **अर्थसंकल्पाची मांडणी:** दरवर्षी, राज्याचा अर्थमंत्री विधानसभेत येणाऱ्या आर्थिक वर्षासाठी राज्याचा अर्थसंकल्प सादर करतो. या अर्थसंकल्पात सरकारचे अपेक्षित **उत्पन्न** (उदा. कर, शुल्क) आणि **खर्च** यांचा तपशील असतो. यामध्ये विविध विकास योजनांसाठी आणि प्रशासकीय खर्चासाठी आवश्यक असलेल्या निधीचा उल्लेख असतो.
- **मंजुरीचे महत्त्व:** अर्थसंकल्प विधानसभेत मांडला गेल्यानंतर त्यावर सखोल चर्चा होते. सदस्य प्रत्येक विभागाच्या निधी मागणीवर प्रश्न विचारू शकतात, कट-मोशन मांडू शकतात आणि धोरणांवर चर्चा करू शकतात. **विधानसभेच्या मंजुरीशिवाय** सरकारला जनतेच्या तिजोरीतून एकही पैसा खर्च करता येत नाही. यामुळे सरकारला त्यांच्या आर्थिक धोरणांसाठी आणि खर्चासाठी विधानसभेला जबाबदार राहावे लागते.

**२. अनुदान मागण्या :** अर्थसंकल्पाचा एक महत्त्वाचा भाग म्हणजे **अनुदान मागण्या होय.**

- **प्रक्रिया:** अर्थसंकल्प सादर झाल्यानंतर, प्रत्येक सरकारी विभाग आपल्या अपेक्षित खर्चासाठी विधानसभेकडे 'अनुदान मागणी' सादर करतो. या मागण्यांवर विधानसभेत सविस्तर चर्चा होते. आमदार प्रत्येक विभागाच्या निधी वापराच्या औचित्यावर प्रश्न विचारू शकतात आणि आवश्यक वाटल्यास त्यात कपात सुचवू शकतात.
- **मंजुरी आणि विनियोजन विधेयक:** विधानसभेच्या सदस्यांनी चर्चा करून या मागण्या मंजूर केल्यानंतर, त्यांना **विनियोजन विधेयकात** समाविष्ट केले जाते. हे विनियोजन विधेयक विधानसभेने संमत केल्यावरच सरकारला राज्याच्या संचित निधीतून पैसे काढण्याचा अधिकार मिळतो. हे विधानसभेचे सरकारवरील खर्चाचे थेट नियंत्रण दर्शवते.

**३. वित्तीय विधेयके :** पैशाशी संबंधित विधेयकांना **धन विधेयक** असे म्हणतात आणि त्यांना एक विशेष दर्जा असतो.

- **केवळ विधानसभेतच मांडणी:** धन विधेयक केवळ **विधानसभेतच मांडले** जाऊ शकते आणि तेही **केवळ मंत्र्यांद्वारेच.** सामान्य विधेयकांप्रमाणे ते कोणत्याही सदस्याद्वारे मांडले जात नाही.
- **राज्यपालांची पूर्वपरवानगी:** धन विधेयक मांडण्यापूर्वी **राज्यपालांची पूर्वपरवानगी** आवश्यक असते.
- **विधान परिषदेचे मर्यादित अधिकार:** ज्या राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात आहे, तिथे धन विधेयक विधानसभेने संमत केल्यानंतर विधान परिषदेकडे पाठवले जाते. परंतु, विधान परिषदेला धन विधेयकाला **फक्त १४ दिवसांपर्यंत थांबवून ठेवण्याचा अधिकार असतो.** या कालावधीत ती विधेयकावर काही सूचना देऊ शकते, पण त्या सूचना विधानसभेवर बंधनकारक नसतात. १४ दिवसांनंतर किंवा परिषदेने संमती दिल्यावर (जे लवकर होईल ते) विधेयक संमत झाल्याचे मानले जाते, जरी परिषदेने त्याला विरोध केला असला तरी. यामुळे राज्याच्या वित्तीय धोरणांवर विधानसभेचे निर्विवाद वर्चस्व दिसून येते.

**४. लेखा समित्यांद्वारे नियंत्रण :**

विधानसभा काही महत्त्वाच्या स्थायी समित्यांच्या माध्यमातून सरकारच्या वित्तीय कामकाजावर बारकाईने नजर ठेवते.

- **लोकलेखा समिती (Public Accounts Committee - PAC):** ही समिती नियंत्रक व महालेखा परीक्षक (Comptroller and Auditor General - CAG) यांनी सादर केलेल्या सरकारी खर्चाच्या अहवालांची तपासणी करते. सरकारने निधीचा योग्य वापर केला आहे की नाही, गैरव्यवहार झाला आहे का, याची ही समिती चौकशी करते.

- **अंदाज समिती (Estimates Committee):** ही समिती सरकारी खर्चात बचत कशी करता येईल आणि प्रशासन अधिक कार्यक्षम कसे बनवता येईल, याबद्दल अंदाज लावते आणि शिफारसी करते.
- **सार्वजनिक उपक्रम समिती (Committee on Public Undertakings):** सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या (उदा. सरकारी कंपन्या) आर्थिक कामकाजाची तपासणी करते.

या समित्या विधानसभेला सरकारच्या वित्तीय अनियमितता आणि अकार्यक्षमतेवर लक्ष ठेवण्यास मदत करतात आणि सरकारला वित्तीय शिस्त पाळण्यास भाग पाडतात

**५. निवडणूक विषयक कार्ये :**

विधानसभा काही महत्त्वाच्या निवडणुकांमध्ये भाग घेते.

- **राष्ट्रपती निवडणूक:** विधानसभेचे निर्वाचित सदस्य भारताच्या राष्ट्रपतींच्या निवडणुकीत मतदान करतात.
- **राज्यसभा सदस्य निवड:** विधानसभेचे सदस्य राज्यसभेवर **रा**ज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सदस्यांची निवड करतात.
- **विधानसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष निवड:** विधानसभा आपल्या सदस्यांमधून **अध्यक्ष** आणि **उपाध्यक्ष** यांची निवड करते.

**६. घटनादुरुस्ती विषयक कार्ये :**

जरी घटनादुरुस्तीचे मुख्य अधिकार संसदेला असले, तरी काही विशिष्ट घटनादुरुस्त्यांसाठी राज्यांच्या विधानमंडळांच्या (त्यामुळे विधानसभेच्या) मंजुरीची आवश्यकता असते.

- **केंद्र-राज्य संबंध:** केंद्र-राज्य संबंधांशी संबंधित संविधानातील काही तरतुदींमध्ये बदल करायचा असल्यास, किमान निम्म्या राज्यांच्या विधानमंडळांची साधी बहुमताने मंजुरी आवश्यक असते.

**७. इतर कार्ये :**

- **चर्चा आणि विचारमंथन:** विधानसभा हे सार्वजनिक महत्त्वाच्या विषयांवर चर्चा आणि विचारमंथन करण्याचे व्यासपीठ आहे. यामुळे लोकमत घडण्यास मदत होते.
- **लोक समस्यांचे निराकरण:** आमदार त्यांच्या मतदारसंघातील लोकांच्या समस्या विधानसभेत मांडतात आणि सरकारकडून त्यावर उपाययोजना करण्याची मागणी करतात.
- **अहवाल तपासणे:** राज्याच्या विविध आयोगांचे (उदा. राज्य लोकसेवा आयोग, महालेखापाल) आणि संस्थांचे अहवाल विधानसभेत मांडले जातात आणि त्यावर चर्चा होते.

थोडक्यात विधानसभा हे राज्याच्या लोकशाहीचे हृदय आहे, जे केवळ कायदे बनवत नाही तर सरकारला जनतेला जबाबदार धरते आणि राज्याच्या विकासाची दिशा ठरवते.

- **महाराष्ट्र विधानसभा अध्यक्ष : ॲड. राहुल नार्वेकर** (भारतीय जनता पक्ष) हे महाराष्ट्र विधानसभेचे विद्यमान अध्यक्ष आहेत. त्यांनी ०३ जुलै २०२२ रोजीपासून हे पद सांभाळले आहे. ते १७वे आणि १८वे अध्यक्ष आहेत, कारण ते या पदावर सलग दुसऱ्यांदा निवडले गेले आहेत.
- **महाराष्ट्र विधानसभा उपाध्य : अण्णा बनसोडे** (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष) हे महाराष्ट्र विधानसभेचे विद्यमान उपाध्यक्ष आहेत. त्यांची नियुक्ती २४ मार्च २०२५ रोजीपासून झाली आहे. ते पिंपरी मतदारसंघाचे तीन वेळा आमदार आहेत

## III) विधान परिषदेची रचना

भारतीय संविधानाने राज्यांना विधान परिषद स्थापन करण्याचा किंवा रद्द करण्याचा अधिकार दिला आहे. हे एक असे माध्यम आहे जे विधानसभेच्या घाईघाईने घेतलेल्या निर्णयांवर पुनर्विचार करण्याची आणि विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना कायदेमंडळात प्रतिनिधित्व देण्याची संधी देते. याची संकल्पना ब्रिटिश राजवटीतून वारसा हक्काने मिळाली असून, संविधान निर्मितीवेळी यावर सखोल चर्चा झाली होती. सध्या भारतात महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तेलंगणा या सहा राज्यांमध्ये विधान परिषद अस्तित्वात आहे. एखाद्या राज्याला विधान परिषद स्थापन करायची किंवा रद्द करायची असल्यास, विधानसभेला विशेष बहुमताने ठराव संमत करून संसदेकडे पाठवावा लागतो, त्यानंतर संसद साध्या बहुमताने त्यावर निर्णय घेते. विधान परिषदेची भूमिका आणि महत्त्व अनेक पैलूंमध्ये दिसून येते. हे एक पुनर्विचाराचे सभागृह म्हणून कार्य करते, जे विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांमधील त्रुटी दूर करण्यास मदत करते आणि कायद्यांची गुणवत्ता सुधारते. तसेच, कला, साहित्य, विज्ञान, सहकार आणि समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांतील तज्ज्ञ व्यक्तींना विधान परिषदेद्वारे कायदेमंडळात प्रतिनिधित्व मिळते, ज्यामुळे विविध दृष्टिकोन कायदेनिर्मिती प्रक्रियेत समाविष्ट होतात. याशिवाय, विधान परिषद कायदेशीर प्रक्रिया मजबूत करते, राज्यपालांना महत्त्वाच्या व्यक्तींना नामनिर्देशित करण्याची संधी देते आणि विधानसभेवरील तात्काळ राजकीय दबाव कमी करण्यास मदत करते. मात्र, विधान परिषदेला काही आव्हाने आणि टीकांनाही सामोरे जावे लागते. यापैकी प्रमुख म्हणजे विधानसभेच्या तुलनेत तिचे दुय्यम स्थान आणि वित्तीय विधेयकांवर मर्यादित अधिकार. नामनिर्देशित सदस्यांची निवड अनेकदा राजकीय सोयीनुसार होते, ज्यामुळे मूळ उद्देशाला तडा जातो अशी टीका केली जाते. तसेच, तिच्या कामकाजाचा आर्थिक भार आणि कायदेनिर्मिती प्रक्रियेत उशीर होण्याची शक्यता ही देखील टीकेची प्रमुख कारणे आहेत. या आव्हानांनंतरही, विधान

परिषद राज्याच्या कायदेनिर्मिती प्रक्रियेत एक पूरक आणि महत्त्वाचे अंग म्हणून भूमिका बजावते आणि तिचे अस्तित्व राज्याच्या विशिष्ट गरजा व राजकीय विचारसरणीवर अवलंबून असते.

भारतीय संविधानातील **अनुच्छेद १७१** हे राज्यांमधील विधान रचनेसंबंधीची प्रमुख तरतूद आहे. हे अनुच्छेद विधान परिषदेतील सदस्यांची संख्या आणि त्यांची निवड कशी केली जाते याचे विस्तृत वर्णन करते.

**१.सदस्य संख्या आणि मर्यादा**

अनुच्छेद १७१ (१) नुसार, एखाद्या राज्यातील विधान परिषदेच्या एकूण सदस्यांची संख्या त्या राज्याच्या विधानसभेच्या एकूण सदस्यांच्या एक तृतीयांश (१/३) पेक्षा जास्त नसावी. याचा अर्थ असा की, जर एखाद्या विधानसभेत ३०० सदस्य असतील, तर त्या राज्याच्या विधान परिषदेत १०० पेक्षा जास्त सदस्य असू शकत नाहीत. मात्र, त्याच वेळी, विधान परिषदेची किमान सदस्य संख्या **४० (चाळीस)** पेक्षा कमी नसावी अशीही अट आहे. यामुळे लहान राज्यांनाही किमान प्रतिनिधित्व मिळण्याची खात्री दिली जाते.

भारतातील विधान परिषदेची सदस्यसंख्या

| क्र. | राज्य | विधान परिषदेचे एकूण सदस्य | विधानसभेची सदस्यसंख्या |
|---|---|---|---|
| १ | उत्तर प्रदेश | १०० | ४०३ |
| २ | महाराष्ट्र | ७८ | २८८ |
| ३ | बिहार | ७५ | २४३ |
| ४ | कर्नाटक | ७५ | २२४ |
| ५ | आंध्र प्रदेश | ५८ | १७५ |
| ६ | तेलंगणा | ४० | ११९ |

**२.सदस्यांची निवड प्रक्रिया (१७१ (२) आणि (३))**

विधान परिषद हे राज्याच्या विधिमंडळाचे **वरिष्ठ सभागृह** असून, तिच्या सदस्यांची निवड प्रक्रिया **अप्रत्यक्ष आणि अंशतः नामनिर्देशन** या स्वरूपाची असते. भारतीय संविधानाच्या **अनुच्छेद १७१** मध्ये ही पद्धत स्पष्ट केली आहे. विधान परिषदेतील सदस्य विविध गटांमधून निवडले जातात, ज्यामुळे सभागृहात समाजाच्या विविध स्तरांचे आणि तज्ञांचे प्रतिनिधित्व होते. विधान परिषदेतील **पाच-सहा (5/6) सदस्य निर्वाचित** असतात, तर **एक-षष्ठांश (1/6) सदस्य नामनिर्देशित** असतात.

अनुच्छेद १७१ (२) मध्ये असे नमूद केले आहे की संसदेला कायद्याद्वारे विधान परिषदेच्या रचनेबद्दल तरतुदी करण्याचा अधिकार आहे. त्यानुसार, अनुच्छेद १७१ (३) मध्ये सदस्यांच्या निवडीचे पाच विविध मार्ग स्पष्ट केले आहेत.

- **स्थानिक स्वराज्य संस्थांकडून निवड (१/३ सदस्य):** विधान परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी अंदाजे **एक तृतीयांश (१/३)** सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (जसे की, नगरपालिका, महानगरपालिका, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या) सदस्यांकडून निवडले जातात. ही निवड अशा

पद्धतीने होते की संसद कायद्याद्वारे निर्धारित करेल. हे स्थानिक घटकांना राज्याच्या कायदेमंडळात प्रतिनिधित्व देते.

- **पदवीधर मतदारांकडून निवड (१/१२ सदस्य):** एकूण सदस्यांपैकी अंदाजे **एक बारांश (१/१२)** सदस्य राज्यातील अशा व्यक्तींकडून निवडले जातात, ज्यांना भारतात कोणत्याही विद्यापीठातून किमान **तीन वर्षांपूर्वी पदवी मिळाली** आहे किंवा संसद कायद्याद्वारे निश्चित करेल अशा समकक्ष शैक्षणिक पात्रता धारण करतात. हे उच्चशिक्षित व्यक्तींना कायदेमंडळात येण्याची संधी देते.
- **शिक्षक मतदारांकडून निवड (१/१२ सदस्य):** एकूण सदस्यांपैकी अंदाजे **एक बारांश (१/१२)** सदस्य राज्यातील अशा शिक्षकांकडून निवडले जातात, जे किमान **तीन वर्षांपासून** माध्यमिक शाळा किंवा त्याहून उच्च स्तरावरील शैक्षणिक संस्थांमध्ये अध्यापनाचे कार्य करत आहेत. हे शिक्षकांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी आणि शैक्षणिक धोरणांवर प्रभाव टाकण्यासाठी व्यासपीठ प्रदान करते.
- **विधानसभेच्या सदस्यांकडून निवड (१/३ सदस्य):** विधान परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी अंदाजे **एक तृतीयांश (१/३)** सदस्य विधानसभेच्या सदस्यांद्वारे निवडले जातात. ही निवड अप्रत्यक्षपणे, एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व प्रणालीनुसार होते. हे विधानसभेला विधान परिषदेत आपले प्रतिनिधी पाठवण्याची संधी देते.
- **राज्यपालांकडून नामनिर्देशित (१/६ सदस्य):** उर्वरित सदस्य, म्हणजे एकूण सदस्य संख्येच्या अंदाजे **एक षष्ठांश (१/६) सदस्य राज्यपालांद्वारे नामनिर्देशित** केले जातात. हे सदस्य असे असले पाहिजेत ज्यांना कला, साहित्य, विज्ञान, सहकार चळवळ आणि समाजसेवा यांसारख्या क्षेत्रांमध्ये विशेष ज्ञान किंवा व्यावहारिक अनुभव आहे. या तरतुदीमुळे विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांना थेट निवडणुकीत भाग न घेता कायदेमंडळात योगदान देण्याची संधी मिळते.

उदाहरण : महाराष्ट्र विधानपरिषदेची रचना

| क्र. | सदस्यांचा गट | प्रमाण | सदस्य संख्या (७८ पैकी) | निवडीची प्रक्रिया |
|---|---|---|---|---|
| १ | विधानसभेचे सदस्य | १/३ | ३० | विधानसभेचे निवडून आलेले सदस्य (आमदार) हे या सदस्यांना एकल संक्रमणीय मताद्वारे निवडतात. |
| २ | स्थानिक स्वराज्य संस्था | १/३ | २२ | महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांच्या सदस्यांद्वारे एकल संक्रमणीय मताद्वारे निवड. |
| ३ | राज्यपाल नामनिर्देशित | १/६ | १२ | राज्यपाल हे सदस्य साहित्य, कला, विज्ञान, सहकार चळवळ आणि समाजसेवा या क्षेत्रातील तज्ज्ञांमधून नामनिर्देशित करतात. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | पदवीधर मतदारसंघ | १/१२ | ७ | राज्यात राहणारे आणि तीन वर्षांपूर्वी पदवी घेतलेले मतदार यांना थेट मतदान करून निवडतात. |
| ५ | शिक्षक मतदारसंघ | १/१२ | ७ | किमान तीन वर्षे माध्यमिक शाळा किंवा त्याहून अधिक स्तरावर शिक्षण देणाऱ्या शिक्षकांद्वारे निवड. |
| | एकूण | | ७८ | |

**एकल संक्रमणीय मताद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधित्व**

एकल संक्रमणीय मत पद्धत हे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे एक स्वरूप आहे, ज्याचा उपयोग भारतात प्रामुख्याने राज्यसभा, विधान परिषद आणि राष्ट्रपती व उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसाठी केला जातो.

या पद्धतीमध्ये मतदारांना एकापेक्षा अधिक उमेदवारांना मतदान करण्याचा अधिकार असतो, परंतु ते एकाच वेळी एकापेक्षा अधिक उमेदवारांना मत देत नाहीत.

- संक्रमणीय मत: मतदानासाठी मतपत्रिकेवर उमेदवारांच्या नावापुढे पसंतीक्रम (Preference Order: १, २, ३, ४, इ.) नोंदवावा लागतो. मतदाराने दिलेला पसंतीक्रम हा मत 'संक्रमित' (Transfer) करण्यासाठी महत्त्वाचा असतो.

२. निवडणुकीची प्रक्रिया

ही प्रक्रिया दोन मुख्य टप्प्यांमध्ये चालते:

अ. मतांचा कोटा निश्चित करणे (Determining the Quota)

निवडून येण्यासाठी प्रत्येक उमेदवाराला आवश्यक असलेल्या मतांची संख्या (Quota) निश्चित केली जाते. हा कोटा खालील सूत्राने काढला जातो, ज्याला ड्रूप कोटा (Droop Quota) म्हणतात:

कोटा = {वैध मतांची एकूण संख्या} {निवडून द्यावयाच्या उमेदवारांची एकूण संख्या + 1} + 1

- जो उमेदवार या कोट्याइतकी मते मिळवतो, तो विजयी घोषित होतो.

ब. मतांची मोजणी आणि संक्रमण

1. पहिली पसंती: सर्वप्रथम, सर्व मतांची पहिल्या पसंतीच्या आधारावर मोजणी केली जाते.
2. विजयाची घोषणा: ज्या उमेदवारांना कोट्याइतकी किंवा त्याहून अधिक मते मिळतात, त्यांना विजयी घोषित केले जाते.
3. जास्तीच्या मतांचे संक्रमण : जर एखाद्या उमेदवाराला कोट्यापेक्षा जास्त मते मिळाली, तर त्याची जास्तीची मते मतदारांच्या दुसऱ्या पसंतीक्रमानुसार पराभूत उमेदवारांना (ज्यांना अजून कोटा पूर्ण करायचा आहे) हस्तांतरित (संक्रमित) केली जातात.
4. सर्वात कमी मते मिळालेल्या उमेदवाराला वगळणे : जर कोणत्याही उमेदवाराने कोटा पूर्ण केला नाही, तर ज्या उमेदवाराला सर्वात कमी मते मिळाली असतील, त्याला वगळले जाते आणि त्याची मते मतदारांच्या पुढील पसंतीक्रमानुसार उर्वरित उमेदवारांना हस्तांतरित केली जातात.

ही प्रक्रिया आवश्यक उमेदवार निवडून येईपर्यंत किंवा सर्व जागा भरेपर्यंत सुरू राहते.

३. प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे स्वरूप :

या पद्धतीमुळे मोठ्या मतदारसंघातील अल्पसंख्याक गटांनाही प्रतिनिधित्व मिळण्याची संधी मिळते.

- ज्या पक्षाला एकूण मतांच्या विशिष्ट टक्केवारीइतकी मते मिळतात, त्या पक्षाला साधारणपणे तेवढ्याच टक्केवारीत जागा मिळतात. यामुळे लहान आणि मोठे पक्ष या दोघांचेही प्रतिनिधित्व सभागृहात योग्य प्रमाणात राखले **जाते.**

**३.कायमस्वरूपी सभागृह**

**राज्यसभा प्रमाणेच, विधान परिषद हे कधीही पूर्णपणे विसर्जित होत नाही.** विधान परिषद कधीही एकाच वेळी पूर्णपणे रद्द होत नाही आणि तिच्या सर्व सदस्यांना पुन्हा निवडणुकीला सामोरे जावे लागत नाही. हे विधान परिषदेला एक सातत्य आणि स्थिरता प्रदान करते, ज्यामुळे धोरणनिर्मिती आणि कायदेशीर प्रक्रियेत अनुभवाचे सातत्य राखले जाते.

**४.सदस्यांचा कार्यकाळ**

विधान परिषद कायमस्वरूपी असली तरी, तिचे सदस्य मात्र विशिष्ट कालावधीसाठी निवडले जातात.

- **कार्यकाळ:** विधान परिषदेतील प्रत्येक सदस्याचा कार्यकाळ **सहा वर्षांचा** असतो. हा कार्यकाळ राज्यसभेच्या सदस्यांच्या कार्यकाळाप्रमाणेच असतो.
- **निवृत्ती आणि पुनर्निर्वाचन:** जरी सभागृह कायमस्वरूपी असले तरी, त्याचे सदस्य एकाच वेळी निवृत्त होत नाहीत. त्याऐवजी, दर दोन वर्षांनी, विधान परिषदेच्या एकूण सदस्यांपैकी **एक तृतीयांश (१/३) सदस्य निवृत्त होतात.** या निवृत्त होणाऱ्या सदस्यांच्या जागी नवीन सदस्य निवडले जातात. ही प्रक्रिया चक्राकार पद्धतीने (cyclical process) चालू राहते. यामुळे:
  - सभागृहातील अनुभवाचे सातत्य टिकून राहते, कारण नेहमीच अनुभवी आणि नवीन सदस्यांचा मिलाफ असतो.
  - राजकीय अस्थिरतेच्या काळातही कायदेमंडळाचा एक भाग कार्यरत राहतो.
  - निवडणुका एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर घेण्याची गरज भासत नाही, ज्यामुळे प्रशासकीय सोयीसुविधा राखल्या जातात.

या व्यवस्थेमुळे विधान परिषद एक स्थिर आणि सतत कार्यरत राहणारे सभागृह बनते, जे राज्याच्या कायदेमंडळाला सातत्य आणि दीर्घकालीन दृष्टिकोन प्रदान करते.

**५. विधानपरिषद सभापती :**

- **निवड**
  - **विधान परिषद सदस्यांकडून:** विधान परिषदेचे सदस्य **आपल्यामधूनच** एका सदस्याची **सभापती** म्हणून निवड करतात.
- **कार्यकाळ आणि पदमुक्ती (Term and Removal)**
  - **कार्यकाळ:** सभापतींचा कार्यकाळ हा ते विधान परिषदेचे सदस्य असेपर्यंत असतो, जो सामान्यतः **सहा वर्षांचा** असतो.
  - **पद सोडणे:** ते खालीलपैकी कोणत्याही कारणामुळे आपले पद सोडू शकतात:
    - जर त्यांचे विधान परिषदेचे सदस्यत्व संपुष्टात आले.
    - जर त्यांनी **उपसभापतींना** उद्देशून लेखी राजीनामा दिला.

- ○ जर त्यांना विधान परिषदेने **बहुमताने मंजूर केलेल्या ठरावाद्वारे** पदावरून दूर केले. (असा ठराव मांडण्यापूर्वी किमान **१४ दिवसांची पूर्वसूचना** देणे आवश्यक असते.)

- **कार्ये आणि अधिकार**

विधान परिषदेचे सभापती खालील महत्त्वाची कार्ये पार पाडतात:

- **सभागृहाचे कामकाज:** विधान परिषदेच्या बैठकांचे **अध्यक्षस्थान** स्वीकारणे आणि सभागृहाचे कामकाज **शिस्तबद्ध** पद्धतीने चालवणे.
- **शिस्त आणि नियमन:** सभागृहात **शांतता व सुव्यवस्था** राखणे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सदस्यांना निलंबितकरणे किंवा बैठकीतून बाहेर काढणे.
- **मताधिकार:** सामान्यतः, ते **मतदान करत नाहीत** परंतु, एखाद्या विषयावर **समान मते** पडल्यास, ते आपले **निर्णायक मत** देतात.
- **विधेयकाचे प्रमाणीकरण:** विधान परिषदेत मंजूर झालेल्या विधेयकांवर ते स्वाक्षरी करून विधानसभेकडे किंवा राज्यपालांकडे पाठवतात.
- **अधिकार आणि विशेषाधिकार:** सदस्यांचे अधिकार आणि विशेषाधिकार जपण्याची जबाबदारी सभापतींची असते.

- **उपसभापती :**

सभापतींच्या अनुपस्थितीत किंवा त्यांचे पद रिक्त असताना, उपसभापती त्यांचे कार्यभार स्वीकारतात. उपसभापतींची निवडही विधान परिषदेचे सदस्य आपल्यामधूनच करतात.

## IV)विधान परिषदेचे अधिकार आणि कार्ये:

विधान परिषद, हे राज्य विधिमंडळाचे वरिष्ठ सभागृह असले तरी, त्याचे अधिकार हे विधानसभेच्या तुलनेत मर्यादित असतात. विधान परिषदेची मुख्य भूमिका विधानसभेने मंजूर केलेल्या विधेयकांवर **फेरविचार करणे आणि त्यावर चर्चा करणे** ही आहे.

**१. विधिविषयक अधिकार विधान परिषदेचे कायदेनिर्मिती क्षेत्रातील अधिकार खालीलप्रमाणे आहेत:**

- **साधारण विधेयके :**साधारण विधेयके विधानसभेत किंवा विधान परिषदेत, दोन्ही सभागृहांपैकी कोणत्याही एका सभागृहात मांडली जाऊ शकतात.
  - ○ जर विधान परिषदेने एखाद्या विधेयकाला मंजुरी दिली, तर ते विधानसभेकडे जाते.
  - ○ जर विधानसभेने एखाद्या विधेयकाला मंजुरी दिली, तर ते विधान परिषदेकडे येते.
  - ○ **विधेयकावर विचार करण्याची मर्यादा:** विधान परिषदेला एखाद्या साधारण विधेयकावर चर्चा करण्याचा, त्यात दुरुस्त्या सुचवण्याचा किंवा ते रोखून ठेवण्याचा अधिकार आहे. मात्र,

हे अधिकार मर्यादित आहेत. विधान परिषद एखाद्या साधारण विधेयकाला **जास्तीत जास्त चार महिने** रोखून ठेवू शकते. यामध्ये, पहिल्यांदा विधेयक आल्यावर ते तीन महिने आणि विधानसभेने ते विधेयक पुन्हा मंजूर करून पाठवल्यास आणखी एक महिना असे एकूण चार महिने रोखण्याची मुभा असते.

- जर विधानसभेने विधान परिषदेच्या शिफारसी स्वीकारल्या नाहीत किंवा विधेयक पुन्हा मंजूर करून पाठवले, तर विधान परिषदेचा विरोध विचारात घेतला जात नाही आणि ते विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले असे मानले जाते. थोडक्यात, **विधान परिषदेकडे साधारण विधेयकांना अनिश्चित काळासाठी रोखण्याची किंवा रद्द करण्याची शक्ती नाही.**

- **वित्तीय विधेयके :** वित्तीय विधेयकांच्या बाबतीत विधान परिषदेचे अधिकार अत्यंत मर्यादित आहेत.
    - ही विधेयके केवळ **विधानसभेतच** सादर केली जाऊ शकतात. विधान परिषदेला वित्तीय विधेयक मांडण्याचा अधिकार नाही.
    - विधानसभेने मंजूर केलेले वित्तीय विधेयक विधान परिषदेकडे फक्त **शिफारशींसाठी** पाठवले जाते.
    - विधान परिषदेला त्यावर **१४ दिवसांच्या आत** आपल्या शिफारसी विधानसभेकडे परत पाठवाव्या लागतात.
    - विधानसभा या शिफारसी स्वीकारण्यास किंवा नाकारण्यास **बाध्य नाही**.
    - जर विधान परिषदेने १४ दिवसांच्या आत विधेयक परत पाठवले नाही, तर ते विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले असे मानले जाते.
    - सर्वात महत्त्वाचे म्हणजे, विधान परिषद कोणत्याही वित्तीय विधेयकाला **रोखून ठेवू शकत नाही किंवा त्यात बदल करू शकत नाही.** विधानसभेचा निर्णय याबाबतीत अंतिम असतो.

**२. कार्यकारी अधिकार**

**कार्यकारी मंडळाच्या (सरकारच्या) बाबतीत विधान परिषदेचे अधिकार खूपच कमी आहेत.**

- **मंत्रिपरिषदेची जबाबदारी:** राज्यातील मंत्रिपरिषद प्रामुख्याने **विधानसभेला जबाबदार असते, विधान परिषदेला नाही.** याचा अर्थ असा की, मंत्री विधानसभेच्या सदस्यांच्या विश्वासावर सत्तेत राहतात.
- **सरकारवरील नियंत्रण:** विधान परिषदेचे सदस्य मंत्र्यांना प्रश्न विचारू शकतात, पुरवणी प्रश्न विचारू शकतात, सरकारवर टीका करू शकतात आणि विविध मुद्द्यांवर चर्चा घडवून आणू शकतात. यामुळे सरकारला जनतेला आणि कायदेमंडळाला उत्तरदायी राहावे लागते.

- **अविश्वास ठराव नाही:** मात्र, विधान परिषदेला **अविश्वास ठराव (No-Confidence Motion) मांडून सरकारला सत्तेवरून दूर करण्याचा अधिकार नाही.** हा अधिकार केवळ विधानसभेला आहे, कारण विधानसभा थेट जनतेद्वारे निवडलेल्या प्रतिनिधींचे सभागृह आहे.

**३. इतर कार्ये :**

कायदेनिर्मिती आणि कार्यकारी नियंत्रणाव्यतिरिक्त, विधान परिषद इतर महत्त्वपूर्ण कार्ये करते:

- **विद्वान व्यक्तींसाठी व्यासपीठ:** हे सभागृह **कला, साहित्य, विज्ञान, समाजसेवा** इत्यादी क्षेत्रांतील तज्ञ आणि अनुभवी व्यक्तींना राज्याच्या कायदेमंडळात सहभागी होण्याची संधी देते. अशा व्यक्तींना अनेकदा थेट निवडणुकीतून निवडून येणे शक्य नसते, परंतु त्यांचे ज्ञान आणि अनुभव राज्याच्या धोरणनिर्मितीसाठी महत्त्वाचे ठरतात.
- **दुसऱ्यांदा विचार करण्याची संधी (Revising Chamber):** विधान परिषद विधानसभेने घाईघाईने किंवा कमी विचार करून मंजूर केलेल्या विधेयकांवर **फेरविचार करण्यासाठी** एक महत्त्वपूर्ण मंच प्रदान करते. यामुळे कायद्यांची गुणवत्ता सुधारण्यास आणि संभाव्य त्रुटी दूर करण्यास मदत होते.
- **चर्चा आणि विचारमंथन:** राज्यस्तरीय महत्त्वाच्या मुद्द्यांवर सखोल चर्चा आणि विचारमंथन करण्यासाठी विधान परिषद एक व्यासपीठ म्हणून कार्य करते. विविध विषयांवर अभ्यासपूर्ण चर्चा येथे होऊ शकते.
- **समित्यांचे कार्य:** विधान परिषदेच्या सदस्यांना विविध समित्यांमध्ये (उदा. स्थायी समित्या, निवड समित्या) काम करण्याची संधी मिळते. यामुळे त्यांना कायदेशीर प्रक्रियेत आणि धोरण निर्मितीत अधिक सक्रिय सहभाग घेता येतो, ज्यामुळे कायद्यांना अंतिम स्वरूप देताना विविध पैलूंचा विचार केला जातो.

थोडक्यात, विधान परिषद हे राज्य विधिमंडळात एक **महत्त्वाचे दुय्यम सभागृह** म्हणून कार्य करते. ते विधानसभेच्या कार्यावर नियंत्रण ठेवते, विधेयकांवर फेरविचार करण्याची संधी देते आणि कायद्यांना अधिक विचारपूर्वक आकार देण्यास मदत करते. तथापि, हे स्पष्ट आहे **कीविधानसभेच्या तुलनेत त्याचे अधिकार आणि महत्त्व कमी आहे**, विशेषतः वित्तीय बाबींमध्ये आणि सरकारवरील नियंत्रणाच्या बाबतीत आहे.

**महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती : प्रा. राम शिंदे** (भारतीय जनता पक्ष) हे महाराष्ट्र विधान परिषदेचे विद्यमान सभापती आहेत. त्यांची निवड १९ डिसेंबर २०२४ रोजी झाली आहे. हे पद जुलै २०२२ पासून रिक्त होते.

**महाराष्ट्र विधान परिषदेच्या उपसभापती : डॉ. नीलम गोऱ्हे** (शिवसेना) या महाराष्ट्र विधान परिषदेच्या विद्यमान उपसभापती आहेत. त्या ८ सप्टेंबर २०२० पासून या पदावर कार्यरत आहेत.

## V)राज्यामध्ये कायदा बनवण्याची प्रक्रिया

राज्याच्या विधिमंडळात कोणताही कायदा बनवण्यासाठी एक विशिष्ट आणि बहु-टप्प्यांची प्रक्रिया पाळली जाते, जी विधेयक कायद्यात रूपांतरित करते. ही प्रक्रिया केंद्र सरकारच्या संसदेतील प्रक्रियेप्रमाणेच असते.

**१. विधेयकाची सुरुवात**

राज्यात प्रामुख्याने दोन प्रकारचे विधेयक मांडले जातात: साधे विधेयक आणि धन विधेयक होय.

- **साधे विधेयक :** हे विधेयक विधानसभेत किंवा विधान परिषदेत (जर ती अस्तित्वात असेल तर) कोणत्याही सभागृहात प्रथम मांडले जाऊ शकते.
- **धन विधेयक :** राज्यपालांच्या पूर्व शिफारसीनंतरच विधेयक केवळ विधानसभेतच मांडले जाऊ शकते.
- **सरकारी विधेयक** : हे मंत्री मांडतात.
- **खाजगी सदस्याचे विधेयक :** हे मंत्री नसलेले इतर सदस्य (आमदार) मांडतात.

**२. सभागृहातील वाचन प्रक्रिया**

विधेयक कोणत्याही सभागृहात खालील तीन टप्प्यांतून जाते.

**अ. पहिले वाचन :**

- मंत्री किंवा सदस्य सभागृहात विधेयक सादर करतो आणि त्याचे शीर्षक व उद्दिष्टे स्पष्ट करतो.
- या टप्प्यावर कोणतीही चर्चा होत नाही. विधेयक नंतर राज्याच्या सरकारी राजपत्रात प्रकाशित केले जाते.

**ब. दुसरे वाचन :**

हा सर्वात महत्त्वाचा टप्पा असतो, ज्यात विधेयकावर सविस्तर चर्चा होते. याचे तीन उप-टप्पे आहेत.

1. **सामान्य चर्चा:** विधेयकाच्या तत्त्व आणि उद्देशांवर सामान्य चर्चा होते.
2. **समिती टप्पा:** गरज वाटल्यास, विधेयक सभागृहाच्या निवड समितीकडे किंवा संयुक्त समितीकडे सखोल परीक्षण आणि अहवाल देण्यासाठी पाठवले जाते. समिती आवश्यक बदल सुचवते.
3. **कलमवार विचार:** समितीच्या अहवालावर विचार केल्यानंतर, सभागृहात प्रत्येक कलमावर चर्चा होते आणि आवश्यक असल्यास दुरुस्त्या सुचवून मतदान केले जाते.

**क. तिसरे वाचन**

- या टप्प्यात विधेयक स्वीकारायचे की फेटाळायचे यावर केवळ चर्चा होते.

- विधेयकाच्या मूळ मजकुरात कोणतेही बदल सुचवले जात नाहीत.
- सभागृहाच्या बहुमताने मंजूर झाल्यावर, विधेयक दुसऱ्या सभागृहात पाठवले जाते.

**३. दुसऱ्या सभागृहातील प्रक्रिया**

विधानसभेतून मंजूर झालेले विधेयक विधान परिषदेत पाठवले जाते.

**अ. साधे विधेयक :**

- विधान परिषद हे विधेयक मंजूर करू शकते, त्यात दुरुस्त्या सुचवू शकते किंवा ते फेटाळू शकते.
- विधान परिषदेला हे विधेयक जास्तीत जास्त ४ महिने (पहिले ३ महिने आणि विधानसभेने पुन्हा पाठवल्यावर १ महिना) विलंबित करण्याचा अधिकार आहे.
- ४ महिन्यांच्या आत परिषदेने ते मंजूर न केल्यास किंवा सुचवलेल्या दुरुस्त्या विधानसभेने स्वीकारल्या नसल्यास, ते विधेयक दोन्ही सभागृहांनी मंजूर केले असे मानले जाते. (या ठिकाणी केंद्राप्रमाणे संयुक्त बैठकीची तरतूद नाही.)

**ब. धन विधेयक**

- धन विधेयक विधान परिषदेकडे केवळ शिफारसी करण्यासाठी आणि जास्तीत जास्त १४ दिवसांसाठी पाठवले जाते.
- १४ दिवसांच्या आत परिषदेने ते परत न केल्यास किंवा तिच्या शिफारसी विधानसभेने स्वीकारल्या नसल्यास, ते विधेयक मूळ स्वरूपात दोन्ही सभागृहांनी मंजूर केले असे मानले जाते.

**४. राज्यपालांची संमती (कलम २००)**

दोन्ही सभागृहांनी विधेयक मंजूर केल्यानंतर ते राज्यपालांच्या संमतीसाठी पाठवले जाते. राज्यपाल खालीलपैकी कोणताही पर्याय निवडू शकतात.

- संमती देणे: राज्यपाल संमती दिल्यास, विधेयकाचे कायद्यात (Act) रूपांतर होते.
- संमती रोखून धरणे: राज्यपाल विधेयक नामंजूर करून संमती रोखून धरू शकतात.
- पुनर्विचारासाठी परत पाठवणे: राज्यपाल विधेयक (धन विधेयक वगळता) सभागृहांना पुनर्विचारासाठी परत पाठवू शकतात. सभागृहांनी ते पुन्हा मंजूर करून पाठवल्यास, राज्यपालांना संमती देणे बंधनकारक नसते (हा केंद्रातील राष्ट्रपतींच्या अधिकारापेक्षा वेगळा आहे).
- राष्ट्रपतींच्या विचारासाठी राखून ठेवणे: (कलम २०१) जर विधेयकामुळे उच्च न्यायालयाचे अधिकार धोक्यात येत असतील किंवा ते केंद्राच्या धोरणांशी गंभीरपणे विसंगत असेल, तर राज्यपाल ते राष्ट्रपतींच्या संमतीसाठी राखून ठेवू शकतात.

**५. राष्ट्रपतींची संमती**

जर राज्यपालांनी विधेयक राष्ट्रपतींसाठी राखून ठेवले असेल, तर ते राष्ट्रपतींच्या संमतीनंतरच कायद्यात रूपांतरित होते. यानंतर, हा कायदा राज्याच्या राजपत्रामध्ये प्रकाशित होऊन त्याची अंमलबजावणी सुरू होते.

**१. बहुपर्यायी प्रश्न**

१. भारतीय संविधानाच्या कोणत्या कलमानुसार विधानसभेच्या सदस्यसंख्येची चौकट निश्चित केली आहे?

अ) कलम १६८ ब) कलम १७० क) कलम १७२ ड) कलम १९५

२. विधानसभेची सदस्यसंख्या कमाल किती असू शकते?

अ) ४५० ब) ५०० क) ५५० ड) ६००

३. महाराष्ट्रात विधानसभेच्या एकूण २८८ जागांपैकी अनुसूचित जमाती (ST) साठी किती जागा आरक्षित आहेत?

अ) २९ ब) २१ क) २५ ड) ३५

४. राज्याच्या वित्तीय धोरणांवर विधानसभेचे निर्विवाद वर्चस्व कोणत्या विधेयकाच्या संदर्भात दिसून येते?

अ) साधे विधेयक ब) घटनादुरुस्ती विधेयक

क) धन विधेयक ड) खाजगी सदस्याचे विधेयक

५. विधान परिषदेची कमाल सदस्यसंख्या, विधानसभेच्या एकूण सदस्यांच्या किती भागापेक्षा जास्त नसावी?

अ) एक चतुर्थांश (1/4) ब) एक तृतीयांश (1/3)

क) एक षष्ठांश (1/6) ड) एक अर्धा (1/2)

६. विधान परिषदेची किमान सदस्यसंख्या किती असणे आवश्यक आहे?

अ) ५०ब) ४५ क) ४० ड) ३०

७. विधान परिषदेतील सदस्यांचा कार्यकाळ किती वर्षांचा असतो?

अ) ५ वर्षे ब) ६ वर्षे क) ३ वर्षे ड) तो विधानसभेच्या कार्यकाळा इतका असतो.

८. विधान परिषदेत दर दोन वर्षांनी किती सदस्य निवृत्त होतात?

अ) १/२ सदस्य ब) १/३ सदस्य क) १/६ सदस्य ड) सर्व सदस्य

९. विधान परिषदेतील एकूण सदस्यांपैकी किती सदस्य राज्यपालांद्वारे नामनिर्देशित केले जातात?

अ) १/२ सदस्य ब) १/३ सदस्य क) १/६ सदस्य ड) १/१२

१०. धन विधेयक विधान परिषदेला जास्तीत जास्त किती दिवसांसाठी रोखून ठेवण्याचा अधिकार आहे?

अ) १ महिना (३० दिवस) ब) १४ दिवस क) ३ महिने ड) ४ महिने

११. विधान परिषदेचे सदस्य कोणाकडे राजीनामा देतात?

अ) राज्यपाल ब) मुख्यमंत्री क) विधान परिषदेचे उपसभापती ड) विधानसभा अध्यक्ष

१२. विधान परिषदेचे सदस्य कोण निवडू शकत नाही?

अ) स्थानिक स्वराज्य संस्थांचे सदस्य ब) तीन वर्षांपूर्वी पदवीधर झालेले नागरिक

क) लोकसभा सदस्य (खासदार) ड) विधानसभेचे सदस्य (आमदार)

१३. विधानसभेचे अध्यक्ष सभागृहात 'निर्णायक मत' कधी देतात?

अ) अध्यक्षांना एखाद्या विषयावर आपले मत मांडायचे असल्यास

ब) महत्त्वाच्या विधेयकावर मतदान होत असल्यास

क) मतदानात समान मते पडल्यास

ड) सरकारच्या धोरणांवर चर्चा होत असल्यास

**II. टीप लिहा**

१. विधानसभेचे कार्यकारी मंडळावरील नियंत्रण

३. विधानसभेची वित्तीय कार्ये

४. विधानसभा अध्यक्ष आणि उपाध्यक्षांची भूमिका व कार्ये

५.विधान परिषदेचे कायमस्वरूपी स्वरूप

६.विधान परिषदेतील नामनिर्देशित सदस्यांचे महत्त्व

७. विधान परिषदेचे वित्तीय अधिकारांवर असलेले निर्बंध

**III. सविस्तर उत्तरे लिहा**

१. विधानसभेचे कायदेविषयक अधिकार आणि कार्ये सविस्तर स्पष्ट करा.

२. विधानसभेचे रचना आणि विधानसभा अध्यक्ष यावर चर्चा करा

३. विधानपरिषदचे रचना स्पष्ट करा .

४.विधानपरिषदेचे अधिकार व कार्य स्पष्ट करा

५.राज्य विधिमंडळातील कायद्याची प्रक्रिया स्पष्ट करा.